सकाळ 19 MAR 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विवेक, ज्ञानदा नियतकालिकांची बाजी

## शिवाजी विद्यापीठातर्फे निकाल जाहीर; २६० जणांना विविध लेखांसाठी वैयक्तिक बक्षिसे

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठाच्या महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेत बिगर व्यावसायिक गटात कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाच्या 'विवेक' तर व्यावसायिक गटात आष्टा (जि. सांगली) येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या 'ज्ञानदा' नियतकालिकाला प्रथम क्रमांक मिळाला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते व्यवस्थापन परिषद सभागृहात बक्षीस वितरण झाले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेतील विजेत्या विवेकानंद महाविद्यालय व उपविजेत्या अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या प्राध्यापकांसमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

स्पर्धेत बिगर व्यावसायिक ६८ महाविद्यालयांनी व २६ व्यावसायिक महाविद्यालयांनी भाग घेतला. तसेच या स्पर्धेत सहभागी झालेले १४० विद्यार्थी व १२० विद्यार्थिनी अशा एकूण २६० जणांना विविध लेखांसाठी वैयक्तिक पारितोषिकेही प्रदान करण्यात येणार आहेत. प्राचार्य एस. आर. पाटील (चिखली), प्राचार्य ए. के. गुप्ता (जयसिंगपूर) व प्रा. एन. आर. रानभरे (कोल्हापूर) यांनी प्रातिनिधिक मनोगत व्यक्त केले. बीसीयूडी संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.

**सर्वसाधारण विजेते (कंसात नियतकालिक व संपादकाचे नावे) अनुक्रमे :**

बिगर व्यावसायिक गट- विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर (विवेक, प्रा. नंदकुमार रानभरे), देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कला व विज्ञान महाविद्यालय, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली (अमर, डॉ. प्रकाश कळे), छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (शिवविजय, प्रा. डॉ. शिवलिंग मेनकुदळे).

व्यावसायिक गट- अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, आष्टा (ज्ञानदा, प्रसाद दत्तात्रय कुलकर्णी), डी.के.टी.ई. टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट, इचलकरंजी (अंबर, आर. डी. शिर्के), डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, जयसिंगपूर (व्हर्व, प्रशांत पाटील).

पुण्यनगरी 19 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कलागुणांना प्रोत्साहनासाठीच नियतकालिक स्पर्धा

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन




कोल्हापूर : महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेच्या विजेत्यांसमवेत कुलगुरू देवानंद शिंदे, बीसीयूडी संचालक डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे आदी.

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा हा विद्यापीठाचा अभिनव व दर्जेदार उपक्रम असून विद्यार्थ्यांमधील साहित्यिक कलागुणांना प्रोत्साहित करण्याचे काम करत आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सन २०१४-१५ च्या महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवारी दुपारी व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते पार पडला, त्यावेळी ते बोलत होते.

बिगर व्यावसायिक गटात कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाच्या विवेक, तर व्यावसायिक गटात आष्टा (जि. सांगली) येथील अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजीच्या ज्ञानदा या नियतकालिकांनी प्रथम क्रमांक मिळविले.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, या उपक्रमामधून विद्यार्थ्यांना स्वतःला शोधण्याची संधी मिळते. विषयाची मांडणी, लेखन, समाजप्रबोधनाबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यासाठी प्राध्यापक, प्राचार्य आणि संस्थाचालकांनी प्रयत्न करावेत.

सन २०१४-१५ मधील बिगर व्यावसायिक गट व व्यावसायिक गट यामधील गुणानुक्रमे प्रथम आलेल्या पहिल्या तीन महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा व नियतकालिकांच्या संपादकांचा यावेळी गुणगौरव करण्यात आला. याबरोबरच त्यांना फिरते चषक प्रदान करण्यात आले. स्पर्धेत ६८ बिगर व्यावसायिक महाविद्यालयांनी व २६ व्यावसायिक महाविद्यालयांनी भाग घेतला. तसेच या स्पर्धेत सहभागी झालेले १२० विद्यार्थी व १४० विद्यार्थिनी अशा एकूण २६० जणांना विविध लेखांसाठी वैयक्तिक पारितोषिकेही प्रदान करण्यात येणार आहेत. विद्यापीठाची ही योजना १९७० सालापासून सुरू आहे.

यावेळी बीसीयूडी संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य एस. आर. पाटील (चिखली), प्राचार्य ए. के. गुप्ता व प्रा. एन. आर. रानभरे यांनी प्रातिनिधिक मनोगत व्यक्त केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. नियतकालिक स्पर्धेतील सर्वसाधारण विजेती महाविद्यालये (कंसात नियतकालिक व संपादकाचे नाव याप्रमाणे) अनुक्रमे अशीः- बिगर व्यावसायिक गट- विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर (विवेक, प्रा. नंदकुमार रामचंद्र रानभरे), देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक कला व विज्ञान महाविद्यालय, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली (अमर, डॉ. प्रकाश महादेव दुकळे), छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा (शिवविजय, प्रा. डॉ. शिवलिंग मेनकुदळे)

व्यावसायिक गट- अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी, आष्टा (ज्ञानदा, प्रसाद दत्तात्रय कुलकर्णी), डीकेटीई सोसायटीचे टेक्सटाईल अ‍ॅन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट, इचलकरंजी (अंबर, आर. डी. शिर्के), डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, जयसिंगपूर (व्हर्व, प्रशांत पा. पाटील).